o/c

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.
जा.क्र.झोपुप्रा./ तां.३/ ३५५/२०२५
दिनांक : १२ /०२/२०२५

# झोपडपट्टी पुनर्वसन योजना (अंतिम)

(विकास नियंत्रण नियमावली झोपुप्रा, २०२२ मधील नियम क्र. १४.६.१२(१) अन्वये योजनेस अंतिम प्रशासकीय मान्यता)

प्रस्तावना :

१. मौजे आकुर्डी, सि.स.नं. ५२३२ (पै), MIDC ब्लॉक डी-II, प्लॉट नं. ४८, (स.नं. १२१(पै)), दत्तनगर येथील झोपडपट्टी संदर्भात २३०७३.७६ चौ.मी. क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. दरवेश कन्सट्रकशन्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.०६/०८/२०२४ रोजी सदर मिळकतीवरील ५१.९३ % झोपडीधारकांच्या संमतीसह प्रस्ताव दाखल करणेत आला आहे.

२. सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याच्या दृष्टीने विकसकामार्फत या कार्यालयात दाखल करण्यात आलेल्या प्रस्तावास अनुसरून या प्राधिकरणामार्फ़त दि. ०६/१२/२०२४ रोजी उक्त नियमावलीतील नियम क्र. १४.६.१२(१) अन्वये "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र प्रारुप योजना" सदर मिळकतीवरील झोपडीधारकांना व सर्व संबंधितांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रारूप योजने संदर्भात प्राप्त दावे/हरकत/सुचना संदर्भातील स्थिती खालीलप्रमाणे आहे.

त्यावर हरकतीसाठी १५ दिवसांची मुदत देण्यात आली होती. त्यानुसार सदरच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना (प्रारुप) या मान्यतेवर श्री. अजय राम थोरात व संदीप लोंढे तर्फे ॲड.स्वप्निल पवार यांचा दि.१६/१२/२०२४ रोजीचा हरकत अर्ज या विभागास दि. २६/१२/२०२४ प्राप्त झाला होता, त्यानुषंगाने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या दालनात ०५/०२/२०२५ रोजी सुनावणी ठेवण्यात आली असता,हरकतदार स्वतः सदर सुनावणीकरीता उपस्थित होते. सदर सुनावणी दरम्यान हरकतदार यांनी सदर योजनेस त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे दि.०५/०२/२०२५ रोजीचे ना-हरकत पत्र या कार्यालयास दिले आहे. सबब सदर झोपडपट्टी प्रारूप योजनेस इतर कोणतीही हरकत आल्याचे दिसून येत नाही.

३. सदर योजनेद्वारे विकसक मे. दरवेश कन्सट्रकशन्स यांना सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकरीता या प्राधिकरणाच्या वतीने प्राधिकृत करण्यात येत असून विकसक यांनी उक्त अधिनियमातील व उक्त नियमावलीतील तरतूदीस अधिन राहून सदर योजनेची अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील. सदर योजना राबविण्यासाठी अपेक्षित असलेले व्यवस्थापन व होणारा सर्व खर्च करणेची संपूर्ण जबाबदारी विकसकाची आहे.

४. सदर योजनेचे विकसक मे. दरवेश कन्सट्रकशन्स यांनी सदर मिळकतीवर विहित मुदतीत प्रकल्प सुरू करणे, बांधकाम व प्रकल्प पूर्ण करणे बंधनकारक राहील व या संदर्भातील

शासनाने तसेच प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे अनुपालन करणे विकसक यांच्यावर बंधनकारक राहील.

५. दि. ०६/१२/२०२४ रोजी प्रसिध्द केलेली प्रारूप योजना जशीच्या तशी अंतिम करण्यात येत आहे,आणि सदर प्रकरणी झो.पू. प्राधिकरण, पुणे साठी लागू असलेल्या विकास नियत्रण नियमावली २०२२ च्या विनियम क्र.१४.६.१२.(१) नुसार प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.
६. सदर योजना क्षेत्रात निर्मुलन आदेश पारित झाल्यानंतर विकसकास झोपडीधारकांना दर महा भाडे दि.१२/१२/२०२३रोजीच्या परिपत्रकानुसार देणे बंधनकारक असेल.
७. सदर योजनेत सद्यस्थितीत कलम ३(क) नुसार घोषित केलेल्या क्षेत्रांतर्गत व अंतिम पात्रता यादीमध्ये नमूद केलेले सर्व सार्वजनिक यांचे योजनेत प्रयोजन करणे आणि सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने धार्मिक स्थळांचे पुनर्वसन करणे, विकसक यांच्यावर बंधनकारक राहील.बांधकाम परवानगीपूर्वी सदर बाबतीची पडताळणी करणे आवश्यक राहील.
८. या प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ अन्वये विकास/बांधकाम परवानगी (Commencement Certificate) देणेसंदर्भात आदेश स्वतंत्रपणे पारित करण्यात येतील. सदरच्या अंतिम योजनेमध्ये प्रसंगानुरूप आवश्यक असल्यास बदल करण्यात येतील.

सदर योजना राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत असून माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह आदेश जारी करण्यात येत आहेत. प्रस्तुतचा निर्णय हा सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील आणि त्या संदर्भात अपील दाखल करावयाचे असल्यास ते शीर्षस्थ तक्रार निवारण समिती (Apex Grievances Redressal Committee) कडे करता येईल याची नोंद घ्यावी.

**स्थळ** :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- /०२/२०२५

मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत माहितीस्तव :
१. **मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**
२. **मे. दरवेश कन्सट्रकशन्स**
साईविहार अपार्टमेंट, पहिला मजला, स.नं. १०९/३/१, विजयनगर, काळेवाडी,पिंपरी, पुणे-१७.
३. **मौजे आकुर्डी, सि.स.नं. ५२३२ (पै), MIDC ब्लॉक डी-II, प्लॉट नं. ४८, (स.नं. १२१(पै)), दत्तनगर** येथील झोपडपट्टीधारकांकरीता माहितीसाठी सदर योजना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध करून देण्यात येत आहे.